# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 34) 1 st July 2009 ( No : 07


# बेमुदत कामबंद आंदोलन ठामपणे अमलात आणण्याचा निर्धार

## महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाचा ठराव

# RESOLUTION

## ADOPTED AT THE MEETING OF THE EXECUTIVE COMMITTEE OF THE MFUCTO held in Mumbai on Sunday, 28 th June 2009

1. WHEREAS the MFUCTO Executive Committee at its meeting held in Mumbai on 19th April 2009 considered the long pending demands of the teachers in the Universities and Colleges in Maharashtra and **also the callous act of neglect on the part of the Government of Maharashtra to even grant a meeting to the MFUCTO to negotiate** and find democratic solutions to the long-pending problems affecting thousands of teachers in the State

and

2. WHEREAS the said meeting of the MFUCTO adopted a MOVEMENT RESOLUTION to compel the Government to hold negotiations with the MFUCTO and resolve the issues **through negotiated settlement and whereas MFUCTO communicated the said Resolution to the Hon'ble Minister for Higher & Technical Education Shri Rajesh** Tope and also to the Chief Minister Shri Ashok Chavan by letters dated 20th and 21st April 2009 and submitting to them the Charter of Demands with a request to grant a meeting to the Organization for discussion and settlement of the long pending issues

and

3. WHEREAS all the affiliated units of the MFUCTO organized **demonstrations on 15th June 2009 at the offices of the Joint Directors of Higher Education through out the State of Maharashtra** and submitted letters to the Hon'ble Minister for Higher & Technical Education Shri Rajesh Tope together with copies of the MFUCTO Resolution and the Charter of Demands renewing the call for giving a meeting to the MFUCTO to resolve the long pending Demands of teachers in Maharashtra

and

4. WHEREAS all the affiliated units of the MFUCTO organized **demonstrations on 22nd June 2009 outside offices of the District Collectors through out the State of Maharashtra** and submitted letters to the Hon'ble Chief Minister Shri Ashok Chavan together with copies of the MFUCTO Resolution and the Charter of Demands renewing once again the call for giving a meeting to the MFUCTO to resolve the long pending Demands of teachers in Maharashtra

and

5. WHEREAS consequent on the letter dated 16th June 2009 issued by the Higher & Technical Education Department on the NET/SET qualification condition **MFUCTO held a meeting with Dr. R.V.Kirdak, Director of Higher Education, Maharashtra State on Monday, 22nd June 2009 to discuss the implementation of the directions** contained in the said letter which did not yield any result except that the said official desired to seek clarifications in the matter from the Government

and

6. WHEREAS the Hon'ble Minister stated on the floor of the Legislative Council that as per the UGC Regulations dated 4-4-2000, NET/SET was compulsory, it was also admitted by him that Proviso 2 made it clear that these regulations shall not be applicable to cases where selections of the candidates to the teaching posts have been made prior to the enforcement of these regulations and to a question whether the service of the teachers appointed prior to 4-4-2000 would be counted from the date of their appointments for the purpose of Placements in senior scale and selection grade, **the Hon'ble Minister answered in the affirmative**

and

7. WHEREAS however, though the letter dated 16/6/2009 of the Higher & Technical Education Department addressed to the Director of Higher Education stated that the UGC Regulations dated 4-4-2000 were **'spasht',** the Director of Higher Education in the written Minutes of his meeting with MFUCTO held on 22nd June 2009 stated that **'spashtikarn'** was required, leading to a totally confusing state of affairs

and

8. WHEREAS in spite of the sincere efforts of the MFUCTO to get the pending demands settled through negotiations with the government, so far **the government has not shown any indication of its intention to have negotiations started with the State-level Federation** of University and College Teachers

and

9. WHEREAS **there is no progress in respect of the implementation of the Sixth Pay Commission package** in spite of 80% of the additional expenditure coming as financial assistance from the Central Government to the Government of Maharashtra,

NOW THEREFORE THIS MEETING OF THE EXECUTIVE COMMITTEE OF THE MFUCTO calls upon the teachers in all the Non-agricultural Universities and Colleges affiliated to them in the State of Maharashtra to **go ahead with further actions proposed in the Resolution dated 19th April 2009, viz.,**

**ONE DAY MASS CASUAL on Monday 6th July 2009 and**

**INDEFINITE CEASE WORK from Tuesday, 14th July 2009** in all the Universities and affiliated colleges to press for a total settlement of all the long pending demands contained in the Charter of Demands submitted by the MFUCTO to the Hon'ble Chief Minister and Hon'ble Minister for Higher & Technical Education and continue with the cease work till a negotiated settlement is reached with the Government.

**Mumbai : 28th June 2009**

(C.R., Sadasivan) (E.H. Kathale)
President General Secretary
MFUCTO

# अधिवेशनात व त्यानंतर घडलेल्या घटनाक्रमाचा तपशिल

**प्रा.बी.टी.देशमुख,** *विधानपरिषद सदस्य*

(१) "विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासाठी केंद्रशासनाचे ८० टक्के अर्थसहाय्य मिळविण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न ५०१५३ हा गुरुवार, दिनांक ४ जून २००९ रोजीच्या प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये पहिल्याच क्रमांकावर होता. मुळ लेखी प्रश्न, त्यावर झालेली अनुपूरक प्रश्नोत्तरे या बुलेटीनच्या पृष्ठ क्रमांक १०३ वर दिलेली आहेत. **"एक महिन्याच्या आत कुठल्याही पध्दतीन सहावा वेतन आयोग युनीर्व्हसीटी टिचर्सना लागू होईल."** असे आश्वासन मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी त्या दिवशी दिले. एक महिना संपत आला पण असा शासननिर्णय निघण्याचे कोणतेही चिन्ह नाही, त्याबाबत संघटनेशी चर्चासुद्धा नाही. चर्चेशिवाय शासननिर्णय निघाला तर तो 'काळा' आहे की 'गोरा' आहे हे तो शासननिर्णय निघाला तर व निघाल्यावरच कळेल.

(२) "राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना नेटसेट परीक्षा पूर्वलक्षी प्रभावाने लागू न करण्याबाबत" या विषयावरील लक्षवेधी सूचना शुक्रवार, दिनांक १२ जून २००९ रोजीच्या कामकाजात समाविष्ट होती. सुचनेचा मसुदा व त्यावर मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी केलेले निवेदन याच बुलेटीनच्या पृष्ठ १०४ वर दिलेले आहे. सदरहू लक्षवेधी सूचनेवर झालेल्या अनुपूरक चर्चेमध्ये :-

**(अ)** श्री. वसंतराव खोटरे यांनी "शासनाने निर्णय न कळविल्यामुळे वरिष्ठ व निवड श्रेणीतील स्थान निश्चिती देता आली नाही. म्हणून याबाबतचा शासन निर्णय केव्हा काढणार आहात?" असा प्रश्न विचारला असता मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी "कॅसच्या संदर्भातील जो निर्णय आहे, तो विद्यापीठानेच घ्यावयाचा आहे. त्यामुळे विद्यापीठाने कॅसच्या संदर्भातील निर्णय घेतल्यानंतर पे-फिक्सेशनच्या संदर्भातील निर्णय डायरेक्टर घेतात. अशा पद्धतीची ही प्रोसिजर आहे. या संदर्भात खरे तर मागचा जी.आर. अतिशय सुस्पष्ट आहे परंतु सन्माननीय सदस्य आणि सभागृहाची भावना लक्षात घेऊन **शासनाकडून परत एकदा या संदर्भात अत्यंत कडक सूचना देण्यात येतील."** असे उत्तर दिले.

**(ब)** प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारलेल्या "माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहात दि. २४ डिसेंबर, २००८ पर्यंत आदेश काढतो असे सांगितलेले आहे. पण तसे आदेश निघाले नाही. तेव्हा याबाबतच्या सूचना **नागपूर विद्यापीठाला व इतर विद्यापीठांना देऊन त्याची प्रत सोमवारी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल काय?"** या अनुपूरक प्रश्नाला मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी **"होय"** असे उत्तर दिले.

**(क)** मा. मंत्रिमहोदयांच्या निवेदनातील "तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ४.४.२००० च्या अधिसूचनेद्वारे निर्गमित केलेले विनियम २००० मध्ये सुद्धा वरील प्रमाणे शैक्षणिक अर्हता/ पात्रतेची अट अंतर्भूत करून सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांना असेही सूचित करण्यात आले आहे की, यापुढे दिनांक ४.४.२००० नंतर राज्यातील महाविद्यालयात/विद्यापीठात अधिव्याख्याता पदावर बिगर अर्हताधारक उमेदवारांच्या नियुक्त्या कोणत्याही परिस्थितीत करू नये." हे वाक्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सभागृहात वाचून दाखविले व हे वाक्य खरे आहे पण त्याच वाक्याच्या पुढे त्याच अधिसूचनेत अशीही तरतूद आहे की, **"यथोचितरित्या अस्तित्वात आलेल्या निवड समितीमार्फत या नोटीफिकेशनपूर्वी ज्यांची निवड झालेली आहे आणि त्यावेळी अस्तित्वात असलेली किमान पात्रता जो धारण करतो, त्या शिक्षकाला नेट-सेटच्या पात्रतेचा नियम लागू राहणार नाही"** हे लक्षात आणून दिले व त्यानंतर ते नोटीफिकेशन निघण्यापूर्वी सेवेत आलेल्या शिक्षकांची सेवा स्थाननिश्चितीच्या प्रयोजनार्थ नेमणुकीच्या दिनांकापासून धरावी लागेल अशी सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिली जाईल काय? अशा प्रकारची विचारणा प्रा.बी.टी.देशमुख यांनी केली असता मा. मंत्रिमहोदयांनी "होय" असे उत्तर दिले.

(३) निर्गमित केलेल्या सूचनांची अथवा आदेशाची प्रत सभागृहात मान्य झाल्याप्रमाणे सोमवार, दिनांक १५ जून २००९ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवली जाणे आवश्यक होते पण ती तशी ठेवण्यात आली नाही.

(४) मंगळवार, दिनांक १६ जून २००९ रोजी आम्ही काही सदस्यांनी नियम ९३ अन्वये सकाळी ९.४० वाजता ९३ ची सूचना दाखल केली. ही नियम ९३ ची सूचना सोबत ***सहपत्र एक*** म्हणून दिलेली आहे. (पृष्ठ १०६ पहा)

(५) मंगळवार, दिनांक १६ जून २००९ रोजी इतर कारणामुळे सभागृहात खूपच गोंधळ झाल्यामुळे त्याही दिवशी शासनाने काढलेल्या आदेशांची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली नाही. मात्र सायंकाळी ७.०० वाजताच्या दरम्यान प्रा.बी.टी.देशमुख यांच्या निवासस्थानी (मॅजेस्टिक आमदार निवास) या आदेशाची प्रत पाठविण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत ***सहपत्र दोन*** म्हणून दिलेली आहे. (पृष्ठ १०५ पहा)

(६) दुसऱ्या दिवशी म्हणजे बुधवार, दिनांक १७ जून २००९ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या उपलब्ध पदाधिकाऱ्यांची एक तातडीची बैठक मॅजेस्टिक आमदार निवास मुंबई येथे दुपारी दोन वाजता झाली. "१६ जून २००९ चे शासन आदेश लक्षात घेता पुढील कारवाई बाबत मा. उच्च शिक्षण संचालकांनी तातडीने महासंघाच्या कार्यकारी मंडळाशी चर्चा करण्यास वेळ द्यावी" अशी विनंती करण्याचा निर्णय झाला. फोनवरून संपर्क करून अध्यक्ष प्रा.सी.आर.सदाशिवन यांनी तशी विनंती केली. मा. उच्च शिक्षण संचालकांनी २२ जून २००९ रोजी दुपारी २.०० वाजताची वेळ दिली. ही गोष्ट पत्राद्वारे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांनी 'कन्फर्म' केली ते पत्र सोबत ***सहपत्र तीन*** म्हणून दिलेले आहे. (पृष्ठ १०६ पहा)

(७) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाची तातडीची बैठक सोमवार, दिनांक २२ जून २००९ रोजी सकाळी ११.३० वाजता विद्यापीठ अतिथीगृह, पुणे येथे झाली. त्याच दिवशी सकाळी याबाबतचे एक सविस्तर निवेदन महासंघाच्या अध्यक्ष व सचिवांनी मा. संचालक, उच्च शिक्षण यांना सादर केले. ते निवेदन सोबत ***सहपत्र चार*** म्हणून दिलेले आहे. (पृष्ठ ११० पहा) पुणे येथे झालेल्या महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत दोन महत्वपूर्ण ठराव संमत करण्यात आले. त्यातील पहिला ठराव सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीच्या अंमलबजावणी बाबत असून तो ***सहपत्र पाच*** म्हणून सोबत दिलेला आहे. (पृष्ठ १०७ पहा) दुसरा ठराव नेट/सेट बाबतचा असून तो ***सहपत्र सहा*** म्हणून सोबत दिलेला आहे. (पृष्ठ १०८ पहा)

(८) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या पुणे येथील बैठकीत २२ जून रोजी मंजूर केलेला ठराव क्रमांक एक दुसऱ्या दिवशी दिनांक २३ जून २००९ रोजी एका पत्रान्वये मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना संघटनेच्या अध्यक्षांनी सादर केला. त्याच दिवशीच्या बैठकीत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या पुणे येथील बैठकीत मंजूर केलेला ठराव क्रमांक दोन दुसऱ्याच दिवशी दिनांक २३ जून २००९ रोजी दुसऱ्या एका पत्रान्वये मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना महासंघाच्या अध्यक्षांनी सादर केला. ते पत्र ***सहपत्र सात*** म्हणून सोबत जोडले आहे. (पृष्ठ १०९ पहा)

(९) २२ जून २००९ रोजी दुपारी दोन वाजता महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने उच्च शिक्षण संचालकांची त्यांच्या कार्यालयात भेट घेतली व सकाळी त्यांच्या सुपूर्द केलेल्या निवेदनावर त्यांच्याशी चर्चा केली. ४ एप्रिल २००० पूर्वी नेमणूक झालेल्या अधिव्याख्यात्यांना नेट/सेट ची अट लागू नाही अशा स्पष्ट सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिल्या जातील काय? याला मा मंत्रिमहोदयांनी सभागृहात 'होय' असे उत्तर दिलेले आहे. त्याप्रमाणे शासनाने १६ जून २००९ रोजी आदेश काढून उच्च शिक्षण संचालकांना **"विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. ४.४.२००० रोजी अधिसूचना प्रसिद्ध करून नेट/सेट अर्हतेसंबंधात स्पष्टता केलेली आहे,"** असे कळविले आहे. याच आदेशात पुढे "४ एप्रिल २००० नंतर नियुक्त झालेल्या अधिव्याख्यात्यांच्या बाबतीत विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट/सेट अर्हतेमधून सूट देण्याच्या आदेशामध्ये ज्या दिनांकापासून सूट दिल्याचे नमूद केले आहे त्या दिनांकापासून संबंधित अधिव्याख्यात्यांना करियर ॲडव्हान्समेंट योजनेसाठी पात्र धरून त्या अनुषंगाने योजनेचा फायदा देऊन स्थाननिश्चिती देण्यात यावी." असेही कळविले आहे. त्याप्रमाणे आपण योग्य ती कारवाई करावी अशी त्यांना विनंती करण्यात आली.

(१०) मा. उच्च शिक्षण संचालकांनी या चर्चेत याबाबत अशी भूमिका घेतली की, **"१६ जून २००९ च्या पत्रामध्ये ४.४.२००० नंतर नियुक्ती दिलेल्या अधिव्याख्यात्यांच्या बाबत काय कार्यवाही करावी याच्या स्पष्ट सूचना आहेत व त्या अनुषंगाने संचालनालयाच्या स्तरावरून योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे."** पुढे त्यांनी असेहि सांगितले की, "तथापि, १९.९.९१ ते ११.१२.९९ पर्यत जे अधिव्याख्याते नेट/सेट परीक्षा पास नाहीत/विहित शैक्षणिक अर्हता धारण करीत नाहीत **अशांच्याबाबतीत स्पष्ट सूचना नसल्याने त्यांची १९.९.९१ ची सेवा स्थान निश्चितीसाठी धरावी किंवा कसे याबाबत शासन स्तरावरून योग्य ते आदेश प्राप्त होणे आवश्यक आहे."** ते असेही म्हणाले की "आपल्या निवेदनानुसार दि. १९.९.९१ ते ११.१२.९९ या कालावधीत लागलेल्या अधिव्याख्यात्यांच्या सेवा स्थाननिश्चितीसाठी धरावयाचे किंवा नाही याबाबत शासनाकडून मार्गदर्शन घेत आहे."

(११) महासंघाने इतिवृत्त तयार करण्याचा आग्रह धरला. उच्च शिक्षण संचालकांच्या स्वाक्षरीने अध्यक्षांना देण्यात आलेल्या इतिवृत्ताची प्रत ***सहपत्र आठ*** म्हणून सोबत दिलेली आहे. (पृष्ठ ११२ पहा)

महासंघाच्या कार्यकारी मंडळाशी झालेल्या चर्चेत उच्च शिक्षण संचालकांनी घेतलेली भूमिका अत्यंत असमाधानकारक व नकारार्थी होती ही गोष्ट मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना एक निवेदन दिनांक २६ जून २००९ रोजी सादर करुन संघटनेच्या अध्यक्षांनी कळविली. ते निवेदन सोबत ***सहपत्र नऊ*** म्हणून दिले आहे. (पृष्ठ १०७ पहा)

*****

# विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासाठी केंद्रशासनाचे ८० टक्के अर्थसहाय्य मिळविण्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : गुरुवार, ४ जून २००९ : दुसरे अधिवेशन २००९*

(१) * ५०१५३ **प्रा. बी. टी. देशमुख, श्री. वसंतराव खोटरे , श्री.दिलीपराव सोनवणे** : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ३१ डिसेंबर, २००८ रोजी विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करणारा शासन निर्णय केंद्र शासनाने निर्गमित केला व राज्याने ही वेतन सुधारणा लागू केल्यास जादा भाराच्या ८० टक्के अर्थसहाय्य केंद्रातर्फे दिले जाईल असे त्याच दिवशी किंवा त्या दरम्यान महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांना केंद्र शासनाने कळविले, हे खरे आहे काय,

(२) केंद्र शासनाने हा निधी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सोपविला असून विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक २८ फेब्रुवारी, २००९ रोजी किंवा त्यादरम्यान राज्याच्या शिक्षण सचिवांना पत्र पाठवून ३१ डिसेंबर, २००८ च्या केंद्राच्या शासननिर्णयाप्रमाणे वेतनसुधारणा लागू केल्यास थकबाकी पोटी लागणारी ४० टक्के रक्कम ३१ मार्च, २००९ च्या आत (या आर्थिक वर्षात) राज्य शासनाला द्यायला तयार आहोत असे कळविले हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, २९ डिसेंबर, २००८ रोजी शासनातर्फे उक्त विषयावर सभागृहात देण्यात आलेल्या अभिवचनांची अम्मलबजावणी न होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे** : (१) होय.

(२) होय.

(३) सदर प्रकरणामध्ये वित्तीय बाब अंतर्भूत असल्यामुळे नियोजन व वित्त विभागाशी विचारविनिमय करून निर्णय घेण्यात येत आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख** : महोदय, विचारलेल्या प्रश्नाला अत्यंत दुर्दैवी अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. सबंध राज्यात सहावा वेतन आयोग लागू करण्यासाठी एक रुपयाची मदत कोणाकडूनही मिळत नाही, तर तो भार केवळ राज्य शासनालाच सहन करावा लागतो. १७ लाख कर्मचाऱ्यांबाबत १ रुपया मिळत नाही. हे एकच ठिकाण असे आहे की, जेथे ८० टक्के रक्कम केंद्रशासन देणार आहे. ३१ डिसेंबर रोजी एक शासन निर्णय केंद्र शासना तर्फे काढण्यात आला तो आपल्याला प्राप्त झाला काय? असा प्रश्न विचारला असता त्याला 'होय' असे उत्तर दिलेले आहे. त्यांनी स्पष्टपणे यांना असे कळविलेले आहे की, ८० टक्के रक्कम आम्ही देण्यास तयार आहोत. ही रक्कम जवळपास २ ते ३ हजार कोटी एवढी आपल्या राज्यासाठी मिळणार आहे. त्यांनी असेही कळविले आहे की, ३१ मार्च, २००९ च्या आत आपण थकबाकीची रक्कम अदा करावी व त्यासाठी आमच्याकडून पैसे घेऊन जावे हे खरे आहे काय? या प्रश्नाला सुध्दा 'होय' असे उत्तर दिले आहे. त्यांनी स्पष्टपणे कळविले आहे की, "In view of this, no separate order is required to be issued to State Governments. Details of the Scheme are also available on the website." आणि याबाबत आपण अंमलबजावणी करा. माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात एकदा सांगितले होते ते मी मुद्दाम वाचून दाखवितो. ते म्हणाले होते की, केंद्रशासनाच्या यासंबंधीच्या ऑर्डर्स आल्याबरोबर आम्ही त्याची अंमलबजावणी करु. आता दुर्दैव असे आहे की, थकबाकीसाठी किती रक्कम लागणार अथवा या लोकांना थकबाकीची रक्कम किती मिळणार आहे याचे हिशेब सुध्दा यांच्या विभागाचे तयार नाहीत. वास्तविक ज्या आठवड्यात हकीम समितीचा अहवाल आला त्याच आठवड्यात हा जी.आर. केंद्राकडून राज्याला प्राप्त झालेला आहे. परंतु हा मिळणारा निधी घेण्यास सुध्दा आपले अधिकारी गेले नाहीत. यासंदर्भातील माहिती माननीय वित्तमंत्र्यांना नव्हती, वित्त विभागाकडे प्रस्ताव ठेवला नाही, मार्चमध्ये सभागृहात मा. वित्तमंत्री म्हणाले होते की, ते पत्र आपण द्यावे, जेणेकरुन आवश्यक ती कार्यवाही करता येईल. माझा प्रश्न असा आहे की, सभागृहात जी आश्वासने दिली त्या अनुषंगाने अद्याप कुठलीही कार्यवाही केली नाही ती कार्यवाही कधी करणार? यासंबंधीचा शासन निर्णय येत्या आठ-दहा-पंधरा दिवसात काढणार काय ? कारण तत्वतः हे मान्य केलेले आहे, वेतन सुधारणा पूर्व अग्रीम दिलेला आहे पण वेतन सुधारणा मात्र दिलेली नाही असा हा एकमेव वर्ग आहे याबाबतचा जी.आर. शासन कधीपर्यंत काढणार आहे ?

**श्री. राजेश टोपे** : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी दोन प्रश्न विचारले. **त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी जो राग व्यक्त केला तो योग्य आहे यात वादच नाही.** शासनामध्ये काम करीत असताना नियोजन विभागाकडे काही क्वेरिज गेल्या त्यामुळे हे करण्यास उशिर झालेला आहे. **आता उशिराची मर्यादा ओलांडली हेही खरे आहे.** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचे जे संवर्ग आहेत यासंदर्भात सहावा वेतन आयोगासंबंधीचा निर्णय अद्याप घेतला गेला नाही. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, **ज्यांनी ज्यांनी उशिर केला असेल त्याची चौकशी करु. कारण असा उशिर कोणत्या कारणांनी झाला अथवा केवळ पेंडिंग ठेवण्याचा हेतू होता काय यासंबंधीची चौकशी करुन कारवाई करण्याचा विचार करण्यात येईल.** त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांनी विचारले की, केव्हा लागू करणार याबाबत मला सांगावयाचे आहे की, हा विषय शेवटी मंत्रिमंडळासमोर जाणे आवश्यक असते. परंतु माझी विनंती आहे की, जास्तीत जास्त एक महिन्याची सवलत यासाठी मी सभागृहाला मागत आहे. हे सर्व काम करण्यासाठी मी एक महिन्याची सवलत मागत आहे. यामध्ये काही विचार पूर्वक चर्चा होण्याची आवश्यकता आहे. १ जानेवारी, २००६ पासून ॲरिअर्स देण्याच्या संदर्भातील निर्णय लागू झालेला आहे. त्यामुळे सन २००६-०७ व २००८ पर्यंतचे ८० टक्के ॲरिअर्स दिले जाणार आहेत. हा विषय आर्थिक बाबीच्या संदर्भात असल्यामुळे आम्ही उत्तरात तशा प्रकारचा उल्लेखही केलेला आहे. यामध्ये अगोदर राज्यशासनाला पैसे द्यावे लागणार आहेत व त्यानंतर राज्यशासनाला रिएम्बर्समेंट मिळणार आहेत. यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, सर्वसाधारणतः १५०० कोटी रुपये थकबाकीच्या स्वरुपात द्यावे लागणार आहेत. त्यामुळे हे पैसे किती हप्त्यात द्यावयाचे, कसे द्यावयाचे राज्यकर्मचाऱ्यांप्रमाणे द्यावयाचे की कसे द्यावयाचे या बाबतीत आपल्याला कॅबिनेटमध्ये चर्चा करुन निर्णय घ्यावा लागणार आहे. त्यामुळे या सर्व प्रकरणाला जास्तीत जास्त एक महिन्याची मुदत मागू इच्छितो.

**श्री. बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात एक महिन्यात कार्यवाही पूर्ण केली जाईल असे माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तरात सांगितले आहे. यांचा विभाग, यांचे अधिकारी जागचे हलत नाहीत. ॲरिअर्सच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांना चुकीचे फिडींग झालेले आहे. **या अटीच्या बाबतीत केंद्र शासनाची जी काही योजना आहे ती स्पेसिफीक आहे. त्यांचे म्हणणे एवढेच आहे की, समग्र योजना म्हणून त्यांची योजना अमंलात आणावी.** यामध्ये तुम्हाला फक्त दोनच अटी बदलता येतील. एक म्हणजे तारीख, यासंदर्भात तुम्ही तारीख सुध्दा १.१.२००६ ही ठरविलेली आहे. दुसरी अट अशी आहे की, तुम्हाला हायर वेतनश्रेणी देता येईल, आहे ही वेतनश्रेणी देतांना एवढे कष्ट होतात आहेत या अधिकाऱ्यांना त्यामुळे हायरची गोष्ट दुरच. जी.आर. मधील मी फक्त एक दोन ओळी आपल्याला वाचून दाखवितो. त्यामुळे ॲरिअर्सच्या संदर्भातील विषय अधिकाऱ्यांच्या व आपल्याही डोक्यातून निघून जाईल. Mr. Chairman, Sir, it reads as under: " Payment of Central assistance for implementing the Scheme is also subject to the condition that the entire Scheme of revision of pay scales, together with all the conditions to be laid down by the UGC by way of Regulations and other guidelines shall be implemented by State Governments and Universities and Colleges coming under their jurisdiction as a Composite Scheme without any modification." ही समग्र योजना व ती समग्र योजना म्हणूनच अमलात आणावी लागेल. त्यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही. या अटीवरच ८० टक्के अर्थसहाय्य मिळणार आहे. जे काही आहे ते त्यांना समग्र योजना म्हणून द्यावे लागेल. त्यामुळे वित्त विभाग व उच्च व तंत्रशिक्षण विभागाला या अटीचे काटेकोरपणे पालन करण्याच्या संदर्भात सक्त सूचना आपण देणार काय?

**श्री. राजेश टोपे** : सभापती महोदय, केंद्रशासनाच्या जी.आर. नुसार युजीसीने या संदर्भात काही सूचना केलेल्या आहेत. यामध्ये राज्यसरकारला खूप काही बदल करण्याचे अधिकार नाहीत. परंतु हा विषय आर्थिक बाबीशी संबंधित आहे. आपल्याला ज्या ठिकाणी बदल करण्याचे अधिकार नाही त्या ठिकाणी आपल्याला बदलही करता येणार नाहीत. परंतु याबाबत कॅबिनेटमध्ये चर्चा होण्याची आवश्यकता आहे. **एक महिन्याच्या आत कुठल्याही पध्दतीन सहावा वेतन आयोग युनीर्व्हसीटी टिचर्सना लागू होईल.**

# राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना नेटसेट परीक्षा पूर्वलक्षी प्रभावाने लागू न करण्याबाबत

*महाराष्ट्र विधान परिषद : शुक्रवार, दिनांक १२.०६.२००९ : दुसरे अधिवेशन २००९*

**श्री. वसंतराव खोटरे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री दिलीपराव सोनवणे, विक्रम काळे, जितेंद्र आव्हाड, रणजितसिंह मोहिते पाटील** विधानपरिषद सदस्य यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

**श्री. वसंतराव खोटरे** (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक बेमुदत काम बंद आंदोलन करतील अशी दिनांक २० एप्रिल २००९ रोजीच्या निवेदनाद्वारे मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना प्राध्यापक महासंघाने दिलेली नोटीस, नेटसेट परीक्षा सक्तीची करण्याची कारवाई १९९९ पर्यंत महाराष्ट्रात पार पाडली न जाणे, नेटसेट बाबतची अट शिफारशीच्या स्वरुपाची असणे, ती पूर्वलक्षी प्रभावाने नव्हे, तर भावी प्रभावाने लागू करावी लागेल, असा मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ८ सप्टेंबर १९९४ रोजी दिलेला निर्णय, सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिलेला आहे ही गोष्ट मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी दिनांक ११ डिसेंबर २००१ रोजी सभागृहात मान्य करणे, परिणामी नेटसेट बाबतच्या आपल्या पूर्वीच्या सर्व अधिसूचना रद्द करुन विद्यापीठ अनुदान आयोगाने ४ एप्रिल २००० चे नवे रेग्युलेशन अधिसूचनेसह निर्गमित करणे, विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार नेटसेटची परीक्षा भरतीपूर्व पात्रता परीक्षा म्हणून डिसेंबर १९९९ पूर्वी महाराष्ट्रात विधिवतरित्या लागू करण्यात न येणे, ही राज्य सरकारकडून त्यावेळी झालेली चूक आहे असे तत्कालीन मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी दिनांक ३ ऑगस्ट २००१ रोजी सभागृहात मान्य करणे, विद्यमान उच्च शिक्षणमंत्र्यांनी सुद्धा त्यावेळी राज्य शासनाची चूक झाली होती, हे दिनांक १७ डिसेंबर २००८ रोजी सभागृहात मान्य करणे, दिनांक २७ नोव्हेंबर, २००८ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने Writ Petition Nos. 4266/2006, 5037/08, 4486/2007, 4386/07, 4500/07 and 462/2008 या प्रकरणी दिनांक ५ नोव्हेंबर, २००८ च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पत्राचा उल्लेख करुन प्रकरणी समान निर्णय घेण्याचा दिलेला आदेश, मा. चॅन्सेलरच्या सम्मतीने करण्यात आलेल्या परिनियमातील तरतुदी प्रमाणे २ वर्षाच्या सेवेनंतर सेवेत कायम झालेल्या या अधिव्याख्यात्यांच्या सेवा १८ ऑक्टोबर २००१ च्या शासननिर्णयान्वये अखंडीत राहतील अशी तरतुद केलेली असतांना त्यांच्या नेमणूका तदर्थ आहेत असा भ्रम पसरविण्याचा होत असलेला प्रयत्न, महाराष्ट्रामध्ये विधीवतरित्या नेटसेटची पात्रता परीक्षा सक्तीची करण्यात आल्यापूर्वीच्या कालखंडात व त्यानंतरच्या कालखंडात भरती झालेल्या शिक्षकांना एकसारखी वागणूक देण्याचा होत असलेला दुराग्रह, या सर्व स्थितीची माहीती करुन घेतल्यानंतर मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी "२४ डिसेंबर २००८ च्या आत याबाबतचा शासननिर्णय काढण्यात येईल व पुढच्या तीन महिन्यात या सर्व प्रश्नांना पूर्णविराम देण्यात येईल." असे सांगून सुद्धा याबाबत कोणतीही कारवाई न होणे, यामुळे पसरलेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

**श्री. राजेश टोपे** (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधिच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे निवेदन**

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे दि. २०.४.२००९ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १९.९.१९९१ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार शासकीय व अशासकीय महाविद्यालयातील अधिव्याख्यात्या पदावरील नियुक्ती करीता किमान शैक्षणिक अर्हता निश्चित केली आहे. त्यानुसार उमेदवाराने चांगल्या शैक्षणिक अहवालासह संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी किमान ५५ टक्के गुणांसह उत्तीर्ण केली असली पाहिजे. याशिवाय विद्यापीठ अनुदान आयोगाची राष्ट्रीय पात्रता परीक्षा वा विद्यापीठ अनुदान आयोगाने अधिस्विकृती दिलेली राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (नेट/सेट) उत्तीर्ण केली असली पाहिजे. दिनांक १९.९.१९९१ नंतर अधिव्याख्याता पदावर नियुक्ती दिल्या जाणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने वरील शैक्षणिक अर्हता/पात्रता धारण करणे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विनियम १९९१ अनुसार बंधन कारक आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या या निर्णयानंतर राज्य शासनाने दिनांक २३.१०.१९९२ रोजी शासन निर्णय निर्गमित करुन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्णयाची अम्मलबजावणी करण्याचे आदेश निर्गमित केले. त्यानुसार सर्व विद्यापीठाने त्यांच्या परिनियमामध्ये आवश्यक ते बदल करुन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्णयाची अंमलबजावणी करणे आवश्यक होते.

तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ४.४.२००० च्या अधिसूचनेद्वारे निर्गमित केलेले विनियम २००० मध्ये सुद्धा वरील प्रमाणे शैक्षणिक अर्हता/पात्रतेची अट अंतर्भूत करुन सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांना असेही सूचित करण्यात आले आहे की, यापुढे दिनांक ४.४.२००० नंतर राज्यातील महाविद्यालयात/विद्यापीठात अधिव्याख्याता पदावर बिगर अर्हताधारक उमेदवारांच्या नियुक्त्या कोणत्याही परिस्थितीत करु नये. अशा नियुक्त्या केल्यास त्यास मान्यता व अनुदान दिले जाणार नाही. तसेच दि. ४.४.२०० पासून अशा नियुक्त्या दिल्या असल्यास त्या तात्काळ रद्द कराव्यात.

राज्यातील अकृषि विद्यापीठे व महाविद्यालयात दिनांक १९.९.१९९१ ते ११.१२.९९ या कालावधीत नियुक्त झालेल्या बिगर नेट/सेट अधिव्याख्यात्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने त्याचे बाबत सहानुभूतीपूर्वक विचार करुन शासनाने या कालावधीत अनुदानीत व विनाअनुदानित महाविद्यालयात व संस्थांत नियुक्त झालेल्या अधिव्याख्यात्यांबाबत दिनांक १८.१०.२००१ च्या शासन निर्णयान्वये असा निर्णय घेण्यात आला की, या कालावधीत अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयात व संस्थांमधून निवड समितीमार्फत नियुक्त झालेल्या अधिव्याख्यात्यांच्या सेवा खंडीत होणार नाहीत, या कालावधीतील नियुक्त्या झालेल्या सर्व (बिगर नेट/सेट) अधिव्याख्यात्यांनी डिसेंबर २००३ पर्यंत नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. सदर मुदतीत नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण न होणाऱ्या अधिव्याख्यात्यांना त्यांच्या सेवा निवृत्ती पर्यंत अधिव्याख्याता पदाच्या वेतनवाढी व्यतिरिक्त इतर कोणतेही आर्थिक लाभ (जसे पदोन्नतीस, वरीष्ठ श्रेणी, निवडश्रेणी) देण्यात येऊ नयेत. इत्यादी

मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील ॲप्लीकेशन नं. १८१९/१९९४ मध्ये जो निर्णय दिलेला आहे तो निर्णय दिल्ली विद्यापीठाशी संबंधित आहे. याबाबत याच सभागृहात दि. ३.८.२००१ रोजी सखोल चर्चा झालेली आहे. सदर चर्चेच्या वेळी तत्कालीन मा. मंत्री (उ.व त.शि.) यांनी असे नमूद केले की, विद्यापीठ अनुदान आयोगाने सन १९९१ मध्ये राज्य शासनास पाठविलेले विनियम (रेग्युलेशन्स) राज्य शासनाने असाधारण राजपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक होते. तसे केल्यास ते कायदेशिर विलेख (लिगल इन्स्ट्रुमेंट) ठरले असते. तथापि, राज्य शासनाने यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित केला, ही राज्य शासनाकडून त्यावेळी चूक झाली आहे. मा. मंत्रिमहोदयांचे सदर विधान पहाता यामध्ये नेट/सेटच्या संदर्भात राज्य शासनाकडून कार्यवाही करतांना, त्यामध्ये केवळ तांत्रिक चूक झाली असल्याचे कबुल केल्याचे स्पष्ट होते.

मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दि. २७ नोव्हेंबर, २००८ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये असे नमूद केले आहे की, विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. ५.११.२००८ च्या पत्रान्वये काही विद्यापीठातील अधिव्याख्यात्यांना नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिलेली आहे. यासारखीच अन्य प्रकरणे असल्यास संबंधित विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान आयोगाकडे आवश्यक ते

*सहपत्र दोन*

## महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

*क्रमांक : एनजीसी २००९/(१४५/०९)-विषि-प्रशा, : मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. : दिनांक १६ जून २००९*

प्रति,
मा. कुलगुरु, सर्व विद्यापीठे.
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे,
सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण,
कुलसचिव, सर्व विद्यापीठे.

**विषय :-** विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांना करियर ॲडव्हान्समेंट योजनेंअंतर्गत फायदा देण्याबाबत.

**संदर्भ :-** १) प्रा.बी.टी.देशमुख व इतर विधानपरिषद सदस्य यांनी विधान परिषद नियमातील नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना.

२) विद्यापीठ अनुदान आयोगाचे क्र. डीओ-एफ-३-१/२००० (पीएस) दिनांक ४.४.२००० ची अधिसूचना.

महोदय,

संदर्भाधीन लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या वेळी राज्यातील विविध विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयाअंतर्गत पात्र अधिव्याख्यात्यांना करियर ॲडव्हान्समेंट योजनेचा अद्याप फायदा देण्यात आला नसल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली, त्या अनुषंगाने कळविण्यात येते की,

१) **विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. ४.४.२००० रोजी अधिसूचना प्रसिद्ध करुन नेट/सेट अर्हतेसंबंधात स्पष्टता केलेली आहे, त्या अनुषंगाने दि. ४ एप्रिल, २००० नंतर नियुक्त झालेल्या अधिव्याख्यात्यांच्या बाबतीत,-**

(अ) विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट/सेट अर्हतेमधून सूट देण्याच्या आदेशामध्ये ज्या दिनांकापासून सूट दिल्याचे नमूद केले आहे त्या दिनांकापासून संबंधित अधिव्याख्यात्यांना करियर ॲडव्हान्समेंट योजनेसाठी पात्र धरुन त्या अनुषंगाने योजनेचा फायदा देऊन स्थाननिश्चिती देण्यात यावी.

(ब) ज्या अधिव्यात्यांच्या प्रस्तावामध्ये असा दिनांक नमूद केलेला नाही, अशा अधिव्याख्यात्यांना त्यांच्या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट/सेट अर्हतेमधून सूट देण्याचे आदेश ज्या दिनांकास निर्गमित केले आहेत त्या दिनांकापासून स्थाननिश्चिती करण्यात यावी.

(क) ज्या अधिव्याख्यात्यांच्या बाबतीत सूट दिलेली आहे परंतु अर्हता धारण करण्यास विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या आदेशात काही अवधी दिलेला आहे अशांच्या बाबतीत विद्यापीठ अनुदान आयोगाकडून अधिव्याख्यातानिहाय त्यांच्या सूट मिळाल्याच्या दिनांकाचे बाबतीत स्पष्ट आदेश घेऊन त्या दिनांकापासून करियर ॲडव्हान्समेंट योजनेचा फायदा देण्यात यावा.

(२) कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या बाबतीत करियर ॲडव्हान्समेंट योजना लागू असणार नाही.

विद्यापीठाने शासन निर्णय दिनांक ११.१२.१९९९ मधील तरतूदींच्या अनुषंगाने गठीत केलेल्या समितीमार्फत स्थाननिश्चिती करण्याचा निर्णय विद्यापीठ स्तरावरच करुन, त्याबाबत **संबंधित विद्यापीठाने "सर्व निकष व नियमांचे पालन करुन अधिकृत समितीमार्फत करियर ॲडव्हान्समेंट योजनेअंतर्गत फायदा दिला" असे "प्रमाणपत्र" दिल्यानंतर विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण यांनी तात्काळ वेतननिश्चिती मान्य करुन द्यावी.**

आपला
(विकास तु. कदम)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रस्ताव पाठवावेत व विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यावर मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. या उच्च न्यायालयाच्या सदर निदेशानुसार विद्यापीठाने व विद्यापीठ अनुदान आयोगाने कार्यवाही करावयाची आहे.

मा. उच्च न्यायालयाने दि. २७.११.२००८ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये मानव संसाधन विकास मंत्रालयाने दि. १२.११.२००८ रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाने या संदर्भात विनियम करावेत असे स्पष्ट आदेश दिले आहेत. तसे मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाने विनियम अद्याप तयार केले नसल्याचे दिसते. विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेले विनियम राज्य शासनास प्राप्त होताच ते लागू करण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात येईल. सद्यस्थितीत या संदर्भात मा. उच्च न्यायालयामध्ये अवमान याचिका दाखल करण्यात आलेली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

सदर नेट/सेट परीक्षा अर्हतेच्या संदर्भात आवश्यक ते आदेश निर्गमित करण्यापूर्वी विधी व न्याय विभाग तसेच महाअधिवक्ता, यांचा सल्ला घेण्यात आला. त्यांनी प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि. २७.११.२००८ च्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत विद्यापीठास कळविण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे दिनांक १७.३.२००९ च्या पत्रान्वये सर्व विद्यापीठांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

### *लक्षवेधी सूचनेवर झालेली अनुपूरक चर्चा*

सदरहू लक्षवेधी सूचनेवर झालेल्या अनुपूरक चर्चेमध्ये (१) श्री. वसंतराव खोटरे यांनी "शासनाने निर्णय न कळविल्यामुळे वरिष्ठ व निवड श्रेणीतील स्थान निश्चिती देता आली नाही. म्हणून याबाबतचा शासन निर्णय केव्हा काढणार आहात?" असा प्रश्न विचारला असता मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी "कॅसच्या संदर्भातील जो निर्णय आहे, तो विद्यापीठानेच घ्यावयाचा आहे. त्यामुळे विद्यापीठाने कॅसच्या संदर्भातील निर्णय घेतल्यानंतर पे-फिक्सेशनच्या संदर्भातील निर्णय डायरेक्टर घेतात. अशा पद्धतीची ही प्रोसिजर आहे. या संदर्भात खरे तर मागचा जी.आर. अतिशय सुस्पष्ट आहे परंतु सन्माननीय सदस्य आणि सभागृहाची भावना लक्षात घेऊन **शासनाकडून परत एकदा या संदर्भात अत्यंत कडक सूचना देण्यात येतील.**" असे उत्तर दिले.

(२) प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारलेल्या "माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहात दि. २४ डिसेंबर, २००८ पर्यंत आदेश काढतो असे सांगितलेले आहे. पण तसे आदेश निघाले नाही. तेव्हा याबाबतच्या सूचना **नागपूर विद्यापीठाला व इतर विद्यापीठांना देऊन त्याची प्रत सोमवारी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल काय?**" या अनुपूरक प्रश्नाला मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी "**होय**" असे उत्तर दिले.

(३) मा. मंत्रिमहोदयांच्या निवेदनातील "तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ४.४.२००० च्या अधिसूचनेद्वारे निर्गमित केलेले विनियम २००० मध्ये सुद्धा वरील प्रमाणे शैक्षणिक अर्हता/ पात्रतेची अट अंतर्भूत करून सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांना असेही सूचित करण्यात आले आहे की, यापुढे दिनांक ४.४.२००० नंतर राज्यातील महाविद्यालयात/विद्यापीठात अधिव्याख्याता पदावर बिगर अर्हताधारक उमेदवारांच्या नियुक्त्या कोणत्याही परिस्थितीत करू नये." हे वाक्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सभागृहात वाचून दाखविले व हे वाक्य खरे आहे पण त्याच वाक्याच्या पुढे त्याच अधिसूचनेत अशीही तरतूद आहे की, "**यथोचितरित्या अस्तित्वात आलेल्या निवड समितीमार्फत या नोटीफिकेशनपूर्वी ज्यांची निवड झालेली आहे आणि त्यावेळी अस्तित्वात असलेली किमान पात्रता जो धारण करतो, त्या शिक्षकाला नेट-सेटच्या पात्रतेचा नियम लागू राहणार नाही**" हे लक्षात आणून दिले व त्यानंतर ते नोटीफिकेशन निघण्यापूर्वी सेवेत आलेल्या शिक्षकांची सेवा स्थाननिश्चितीच्या प्रयोजनार्थ नेमणुकीच्या दिनांकापासून धरावी लागेल अशी सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिली जाईल काय? अशा प्रकारची विचारणा प्रा.बी.टी.देशमुख यांनी केली असता मा. मंत्रिमहोदयांनी "होय" असे उत्तर दिले.

*सहपत्र एक*

## मंगळवार, दिनांक १६ जून २००९ रोजी नियम ९३ अन्वये दिलेली सूचना

**NO. WO\CA93\184 DATED : 16.06.2009**

प्रति,
**मा.सचिव,**
विधान मंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई

आम्ही नियम ९३ अन्वये पुढील सूचनेची नोटीस देत आहोत.

**सुचना**

ज्याअर्थी, शुक्रवार दिनांक १२ जून २००९ रोजी "नेटसेट परीक्षा पूर्वलक्षी प्रभावाने लागू न करणे" या विषयीच्या लक्षवेधी सूचनेवरील अनुपुरक चर्चेमध्ये मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी या संदर्भात वेगळा शासननिर्णय काढण्याची आवश्यकता नाही. मात्र अशा शिक्षकांच्या बाबतीत वरिष्ठ श्रेणी किंवा निवडश्रेणीमध्ये स्थाननिश्चिती विद्यापीठाच्या स्तरावरील समितीने करावयाची असून थेट वेतननिर्धारणासाठी संचालक, उच्च शिक्षण यांच्या यंत्रणेकडे ही प्रकरणे पाठवावीत, याबाबतच्या सूचना देण्यात येतील. असे सभागृहाला सांगितले. या सूचना सोमवारी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील काय या अनुपूरक प्रश्नाला मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी "होय" असे उत्तर दिले आणि;

ज्याअर्थी, ४ एप्रिल २००० च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नोटीफिकेशनमध्ये नेटसेटची अट सक्तीची करण्यात आली असून "यापुढे दिनांक ४ एप्रिल २००० नंतर बिगर नेटसेट धारक उमेदवारांना नेमू नये" अशी तरतुद आहे, हे खरे असले तरी ४ एप्रिल २००० पूर्वी यथोचितरित्या निवडसमितीमार्फत निवड झालेल्या व तत्कालीन किमान पात्रता धारण करणाऱ्या शिक्षकाला नेटसेटची अट लागू रहाणार नाही अशीसुद्धा स्पष्ट तरतुद ४ एप्रिल २००० च्याच यु.जी.सी.च्या नोटीफिकेशनमध्ये आहे, तेव्हा ते नोटीफिकेशन निघण्यापूर्वी सेवेत आलेल्या शिक्षकांची सेवा स्थाननिश्चितीच्या प्रयोजनार्थ नेमणूकीच्या दिनांकापासून धरावी लागेल अशी सूचना क्षेत्रिय अधिकाऱ्यांना दिली जाईल काय? अशा प्रकारची विचारणा प्रा.बी.टी.देशमुख यांनी केली असता मा. मंत्रिमहोदयांनी "होय" असे उत्तर दिले आणि;

ज्याअर्थी, अशा प्रकारच्या कोणत्याही सूचना निर्गमित करण्यात आल्या नाहीत व आल्या असल्यास त्या सोमवारी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्या नाहीत. त्यामुळे एकूणच उच्च शिक्षण क्षेत्रात तिव्र असंतोष निर्माण झालेला असून नेटसेटची पात्रता पूर्वलक्षी प्रभावाने लागू न करण्याच्या मागणीसह आपल्या इतरहि मागण्यांसाठी काल महाराष्ट्रातील सर्व उच्च शिक्षण सहसंचालकांच्या कार्यालयासमोर हजारो प्राध्यापकांनी तिव्र निदर्शने केली;

त्याअर्थी, हे सभागृह तिव्र चिंता व्यक्त करित आहे.

**मा. उच्च शिक्षण मंत्री**
**एलसी /**
दिनांक : १६.०६.२००९

**प्रा. बी. टी. देशमुख**
**वसंतराव खोटरे**
**दिलीपराव सोनवणे**

*सहपत्र तीन*

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)**

*Registered under the Trade Union Act 1926, Reg.No.By-II-8162 of 1985*

Affiliated to the All India Federation of University and College Teachers' Organisations (AIFUCTO)

*Vidyapeeth Vidyarthi Bhavan, 'B' Road, Churchgate, Mumbai-400 020.*

President
**Prof. C.R.Sadasivan**
R.K.Gokuldham, A/205, S.V.Road, Borivli (West)
Mumbai - 400 092.
Tel. : 022 - 2806 3667 / 5693 8030

General Secretary
**Prof. E.H.Kathale**
N/162, Reshimbagh,
Nagpur - 440 009.
Tel. : 0712 2741098

**17 th JUNE 2009**

To,
**Dr. R.V.Kirdak,**
Director of Higher Education, Maharashtra State, Central Building, PUNE-1.

**Subject :** Granting of the benefits of Career Advancement Scheme (CAS) to Lecturers in the Universities and affiliated Colleges.

**Reference :** (i) Calling Attention Notice under Rule 101 of Vidhan Parishad Rules tabled by Prof. B.T.Deshmukh and other Vidhan Parishad Members.

(ii) UGC Notification under letter No.Do-F-3-1/2000(PS) dated 4.4.2000

(iii) Letter No. NGC-2009/(145/09)-Vishi-Prasha of Higher & Technical Education, Mantralaya, Mumbai-400 032 dated 16 th June 2009.

Sir,

I Write to confirm the telephonic discussion that I had with you today 17 th June 2009 in the evening at about 4 p.m. on the above subject seeking an urgent appointment with you as Director of Higher Education in Maharashtra for the Executive Committee of the MFUCTO at Pune. You were kind enough to suggest Monday 22 th June 2009 at 2 p.m. for the meeting.

Accordingly MFUCTO will meet you to discuss the CAS referred in the Government letter dated 16.6.2009 addressed to you and others.

On behalf of the MFUCTO I thank you for agreeing to have the said meeting on an urgent basis.

Thanking you.

Yours faithfully
**(C.R.Sadasivan)**

*सहपत्र नऊ*

# MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

**Affiliated to the AIFUCTO**

*Vidyapeeth Vidyarthi Bhavan, B-Road, Churchgate, Mumbai 400 020.*

**President**
Prof. C.R.Sadasivan
R.K.Gokuldham, A/205
S.V.Road, Borivli (West)
Mumbai-400 092

**General Secretary**
Prof. E.H.Kathale
N/162 Reshimbagh
Nagpur, 440 009

**26th June 2009**

Shri Rajesh Tope
Hon'ble Minister for
Higher & Technical Education
Maharashtra State
Mantralaya, Mumbai 400032.

**Sub:** Demonstration of University & College Teachers in Maharashtra under the MFUCTO

**Ref:** (i) Letter No.NGC-2009/(145/09)-Vishi-Prasha dated 16th June 2009 from the Higher & Technical Education Department

(ii) Meeting of MFUCTO Executive Committee with the Director of Higher Education

(iii) Minutes of the said meeting bearing No. UShS/2009/ Steno dated 22/6/2009 (shown wrongly as '20' received from the DHE

Hon'ble Minister, Sir:

